## महत्त्वाचे

### शिवनाथ राठी यांची निवड



औरंगाबाद : माहेश्वरी समाजाच्या प्रदेश सभा ज्येष्ठ कार्यकारिणीवर सदस्य म्हणून शिवनाथ राठी यांची निवड करण्यात आली आहे. निवडीबद्दल समाजबांधवांनी स्वागत केले आहे.

### पवार यांची नियुक्ती



औरंगाबाद : लोकस्वराज्य आंदोलन, औरंगाबादच्या शहर अध्यक्षपदी कैलास पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष प्रा. बी. ए. पारसकर यांनी ही नियुक्ती केली.

### मोटारसायकल रॅली

औरंगाबाद : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना देशाला अर्पण केली त्यास २६ नोव्हेंबर रोजी ६७ वर्षे पूर्ण होत आहेत. या व ऑल इंडिया समता सैनिक दल ट्रेनिंग सेंटरच्या तिसऱ्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शनिवारी सकाळी ८.३० वाजता मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली क्रांतीचौक येथून निघेल. ती भडकलगेटजवळील डॉ.आंबेडकरांच्या पुतळ्यास मानवंदना देईल. ती पुढे छावणीमार्गे पेठेनगर येथील श्रावस्ती बुद्धविहार येथे संविधान उद्देशिकेचे वाचन झाल्यानंतर विसर्जित होईल. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोक गायकवाड, प्रवीण मोरे, डॉ. ऋषिकेश कांबळे, धम्मानंद त्रिशरण हे उपस्थित राहतील, असे समता सैनिक दलाचे सुभेदार विलास शिरसाठ यांनी कळविले आहे.

### कॅरिबॅगचा वापर वाढला

औरंगाबाद : शहरात मोठ्या प्रमाणात कॅरिबॅगचा वापर वाढला आहे. २० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या कॅरिबॅग अजिबात विकण्यात येऊ नयेत, असे शासनाचे सक्त आदेश असतानाही ठिकठिकाणी कॅरिबॅगची विक्री सुरु आहे. शहरात साफसफाई मोहीम राबविताना अनेक ठिकाणी कॅरिबॅग जास्त दिसून येतात. लहान-मोठ्या नाल्यांमध्ये कॅरिबॅग बऱ्याच प्रमाणात दिसून येतात. नाल्यांमध्ये कॅरिबॅग आल्याने पाण्याला नैसर्गिक प्रवाह मिळत नाही.

### विद्यापीठात व्याख्यान

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने डॉ. एस. एन. बसी यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भीमस्मृती' या विषयावर महात्मा फुले सभागृहात शनिवारी २६ रोजी दुपारी १२ वाजता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात येईल. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. सुहास मोराळे यांनी केले आहे.

### तंबाखू नियंत्रण कार्यक्रम

औरंगाबाद : राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीची त्रैमासिक बैठक आज अप्पर जिल्हाधिकारी पी. एल. सोरमारे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. जी. एम. गायकवाड व वैद्यकीय अधिकारी डॉ. सुहास जगताप यांची उपस्थिती होती. सद्य:स्थितीत नोटाबंदीमुळे रुग्णांना, त्यांच्या नातेवाईकांना अडचण येऊ नये याची काळजी आरोग्य विभागाने घ्यावी, अशी सूचना सोरमारे यांनी केली. समितीचे सदस्य सचिव डॉ.गायकवाड यांनी तंबाखू प्रतिबंधक कायद्याच्या कलम ५ बाबत माहिती दिली.

---

**माघार :** बी. ए. चोपडे यांचे कुलसचिवांना आदेश

# कार्यकर्त्यांवरील विविध गुन्हे मागे घ्या

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कुलगुरुंच्या दालनासमोर कुलगुरुंविरोधात आक्षेपार्ह घोषणाबाजी केल्यामुळे स्वाभिमानी मुप्टासह इतर संघटनांच्या कार्यकर्त्यांवर विविध कलमांन्वये दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याचे आदेश स्वत: कुलगुरुंनीच दिल्याने विद्यापीठ वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे.

करिअर बरबाद होण्याच्या भीतीमुळे गुन्हे दाखल असलेल्या कार्यकर्त्यांनी संबंधित गुन्हे मागे घेण्याची मागणी कुलगुरुंकडे केली होती. ही मागणी कुलगुरु डॉ. बी. ए. चोपडे यांनी तात्काळ मान्य करीत गुन्हे मागे घेण्याचे पत्र बेगमपुरा पोलिसांना देण्याचे आदेश कुलसचिवांना दिले आहेत. दरम्यान, या प्रकारामुळे ज्या कर्मचाऱ्यांनी कुलगुरुंच्या आदेशाने पोलिसांना जबाब दिले होते, त्यांच्यात चिंतेचे वातावरण आहे.

विद्यापीठात पीएचडीच्या विद्यार्थ्यांकडून पैसे घेतल्याच्या आरोपावरून मार्गदर्शकांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी काही संघटनांचे कार्यकर्ते ११ मार्च २०१६ रोजी कुलगुरु डॉ. बी. ए. चोपडे यांना निवेदन देण्यासाठी गेले होते. मात्र,



**सर्वजण निरुपद्रवी**

दाखल गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. विद्यापीठाने गुन्हे दाखल केलेल्या प्रकरणातील संबंधित सर्व निरुपद्रवी असून, घटना गैरसमजातून घडली आहे.
-डॉ. बी.ए. चोपडे, कुलगुरु

कुलगुरुंनी सदरील निवेदन स्वीकारण्यास वेळ दिला नाही. यामुळे संतापलेल्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या दालनाबाहेरच कुलगुरुंविरोधात आक्षेपार्ह घोषणाबाजी केली. तेव्हा पोलिसांना पाचारण करत कार्यकर्त्यांना मुख्य इमारतीबाहेर काढले. यानंतर चार दिवसांनी सर्व घटनेचे सीसीटीव्ही फुटेज तपासून कुलगुरुंनी स्वाभिमानी मुप्टाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शंकर अंभोरे, किरण जगताप, प्रवीण सरपाते, किशोर वाघ यांच्यासह सम्यक आंदोलनचे प्रकाश इंगळे, रिपब्लिकन सेनेचे सचिन निकम यांच्यासह इतरांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश सुरक्षा अधिकाऱ्यांना दिले होते. कुलगुरुंच्या आदेशानुसार सुरक्षा अधिकाऱ्याने बेगमपुरा पोलिसांत शासकीय कामकाजात अडथळा,कर्मचाऱ्यांचा रास्ता अडवणे, पूर्वपरवानगी न घेणे आदी कलमांन्वये तक्रार दाखल केली. यानुसार कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते.


या प्रकरणात पोलिसांनी तपास करत विद्यापीठातील घटनास्थळी उपस्थित कुलगुरु कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदवून आरोपपत्रही दाखल केले आहे. आता हे प्रकरण बोर्डावर आलेले असतानाच कार्यकर्त्यांनी गुन्हे मागे घेण्याचे निवेदन कुलगुरुंना दिले. यास कुलगुरुंनी प्रतिसाद देत कुलसचिवांना गुन्हे मागे घेण्याचे पत्र बेगमपुरा पोलिसांत देण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात ज्या कर्मचाऱ्यांनी कुलगुरुंच्या आदेशावरून जबाब दिले होते. त्याच्यात नाराजी पसरली आहे. कुलगुरुंनी एकतर्फी माघार घेत कर्मचाऱ्यांवर अविश्वास दाखवला असल्याचे अनेकांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

# शनिवारी उलगडणार मिशन मंगळयान

**विज्ञान :** इस्रोच्या ज्येष्ठ शास्त्रज्ञ रितू करिधाल यांचे व्याख्यान



औरंगाबाद : सीएमआयए, आस्था फाऊंडेशन आणि यशवंत इन्स्पायरेशनल टॉल्क सिरिजतर्फे इस्रो सॅटेलाईट सेंटर बेंगलोर येथील ज्येष्ठ शास्त्रज्ञ रितू करिधाल यांचे शनिवार २६ नोव्हेंबर रोजी 'मिशन मंगळयान' या विषयावर व्याख्यान होणार असल्याचे सीएमआयएचे माजी अध्यक्ष तथा यशवंत इन्स्पायरेशनल टॉल्क सिरिजचे समन्वयक आशिष गर्दे यांनी कळविले



आहे. तापडिया नाट्यमंदिर येथे सायंकाळी ४ वा. व्याख्यानास सुरुवात होईल.

यशवंत इन्स्पायरेशनल टॉल्क सिरिजतर्फे आयोजित होणारे हे चौथे व्याख्यान आहे. शास्त्रज्ञ करिधाल या व्याख्यानामध्ये 'मिशन मंगळयान'सोबतच 'भारताचा आजवरचा उपग्रह प्रवास' यावरदेखील प्रकाश टाकणार आहेत. त्या २०१४ मध्ये मंगळयान मोहिमेत सहभागी होत्या. या मिशनमध्ये प्रकल्प व्यवस्थापक म्हणून काम करीत असताना त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. त्यावेळचे त्यांचे अनुभव त्या व्याख्यानात कथन करतील. कल्पना, आविष्कार, प्रेरणेतून हे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. शैक्षणिक, विज्ञान आणि तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षक, विद्यार्थी, पालकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.



एकजूट... जीएसटी परिषदेने विक्रीकर कर्मचाऱ्यांच्या अधिकारावर गदा आणण्याचा घाट घातला आहे. याविरोधात विक्रीकर भवनासमोर निदर्शने करताना अधिकारी, कर्मचारी.

# विक्रीकर अधिकारी, कर्मचाऱ्यांची निदर्शने

**आंदोलन :** जीएसटी परिषदेच्या अन्यायकारक धोरणाविरोधात संताप

औरंगाबाद : जीएसटी परिषदेने विक्रीकर कर्मचाऱ्यांच्या अधिकारावर गदा आणणारे धोरण स्वीकारल्याच्या निषेधार्थ विक्रीकर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी 'लेखणी बंद' ठेवून आंदोलन केले. तसेच मध्यंतराच्या सुटीच्या वेळी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली. या आंदोलनातून विक्रीकर अधिकारी,कर्मचाऱ्यांनी आपली एकजूट दाखवून दिली.

दुपारी दीड वाजता विक्रीकर विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी कार्यालयासमोर उभे राहिले व जीएसटी परिषदेच्या विरोधात निदर्शने केली. अखिल भारतीय महासंघ वाणिज्य कर संघटनेच्या निर्णयानुसार महाराष्ट्र विक्रीकर राजपत्रित अधिकारी,कर्मचारी संघटनेतर्फे हे आंदोलन करण्यात आले. यासंदर्भात संघटनेचे विभागीय सचिव सुरेश जोनवाल यांनी सांगितले की, जीएसटी परिषदेने केंद्रीय उत्पादन शुल्क, अबकारी कर आणि सेवाकर विभागाने एकत्रितरीत्या मूल्यवर्धित कर गोळा करणाऱ्या सर्व राज्याचे अधिकार व सेवा शर्तीवर घाला घालण्याचा घाट घातला आहे. यामुळे विक्रीकर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अधिकारावर बंधने येणार आहेत. याचा राज्याच्या तिजोरीवर परिणाम होणार आहे. यासाठी हे आंदोलन सुरु करण्यात आले. आमच्या मागण्या मान्य झाल्या नाही तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. निदर्शनात संघटनेचे विभागीय सदस्य प्रकाश क्षीरसागर,ज्योती गायसमुद्रे,विक्रीकर कर्मचारी संघटनेचे विभागीय उपाध्यक्ष राजू मगर, अध्यक्ष रूपसिंग डोभाळ , माधवसिंग बैनाडे, तसेच जे.चंद्रकांतन् आणि सर्व अधिकारी,कर्मचारी हजर होते. वार्षिक उलाढाल १.५ कोटींपेक्षा कमी असलेल्या वस्तू व सेवा अंमलबजावणीचे अधिकार राज्याच्या कक्षेत असावे, वार्षिक उलाढाल १.५ कोटींपेक्षा अधिक असलेल्या व्यापारी संख्येच्या प्रमाणित राज्यांना ४ व केंद्राला १ यानुसार अधिकाराचे वाटप करावे आदी मागण्या करण्यात आल्या.

---

# हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016

Powered by MK CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME



## मी धावणार माझ्यासाठी

लोकमत तर्फे आयोजित या भव्य मॅरेथॉन स्पर्धेत आम्ही सहभागी होत असून, फिटनेससाठी हा उपक्रम अत्यंत उत्तम आहे. आम्ही शिक्षण क्षेत्राच्या भरभराटीसाठी तसेच औरंगाबाद शहराच्या स्मार्ट सिटी होण्यासाठी यामध्ये सहभागी होत आहोत. -रश्मी बोरसे पाटील, संचालिका- धारेश्वर शिक्षण संस्था, औरंगाबाद




धारेश्वर शिक्षण संस्था... (डावीकडून उभे) विजयकुमार इंगळे, राजेंद्र साळुंके, प्रदीप तेजनकर, संजय सोन्ने, शिवाजी जाधव, प्रकाश सपकाळ, रीना पाटील, रश्मी बोरसे, वंदना पाटील, शोभा वाठोरे, मीरा कुऱ्हाडे, मनीषा पाटील, ममता पवार, अशोक सपाटे, संदीप पाटील, संतोष जाधव, एकनाथ ढोमसे, नरेंद्र सपकाळ, प्रल्हाद पोटे (डावीकडून बसलेले) राहुल पठाडे, आकाश जाधव, रोहन खरात, आरती राठोड, सुवर्णा राठोड, सना शेख.

Co-Sponsors: RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION | ERA INTERNATIONAL SCHOOL

Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (i) pvt.ltd | Partners: blueumbrella

**नाव नोंदणी व सहभागासाठी**

www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२




सान्या मोटार्स... (डावीकडून उभे) बालाजी शिंदे, दगडू बेले, सुरेंद्र चव्हाण, वैभव दुधेकर, नितीन ढाकणे, मिलिंद पाटील, विनायक मारगुडे, अशोक निर्वळ, गणेश शिंदे, किरण जाधव व सुमित गोल्डे.

# महाविद्यालयाकडून शिष्यवृत्तीचे साडेचार लाख रुपये मिळेनात

**अडचण :** संशोधक विद्यार्थिनीची कुलगुरुंकडे तक्रार

औरंगाबाद : विद्यापीठ अनुदान आयोगाने पीएच. डी. पदवीच्या संशोधनासाठी मंजूर केलेल्या राजीव गांधी राष्ट्रीय शिष्यवृत्तीचे साडेचार लाख रुपये महाविद्यालय अदा करीत नसल्याची तक्रार कुलगुरु डॉ. बी. ए. चोपडे यांच्याकडे एका संशोधकाने केली आहे. महाविद्यालयाकडून पैसे देण्यास अडवणूक करण्यात येत असल्याचा आरोपही संशोधकाने केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयातील संशोधन केंद्रात ज्योती विठ्ठलराव दाभाडे या विद्यार्थिनीने हिंदी विषयात २०१२ साली संशोधन पूर्ण केले आहे. या संशोधनासाठी संशोधकाला विद्यापीठ अनुदान आयोगाने २०१० मध्ये राजीव गांधी राष्ट्रीय शिष्यवृत्ती मंजूर केली होती. शिष्यवृत्तीमधील २ लाख ५० हजार रुपये संशोधकाला मिळाले आहेत. मात्र उर्वरित शिष्यवृत्तीचे युटिलायझेशन सर्टिफिकेट सादर केल्यानंतर ३१ मार्च २०१६ रोजी ४ लाख ५३ हजार रुपयांचा निधी मंजूर करून यूजीसीने महाविद्यालयाकडे वर्ग केला आहे. हा निधी वर्ग केल्यानंतरही महाविद्यालयाचे प्रशासन वर्षभरापासून शिष्यवृत्ती अदा करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे तक्रारदार संशोधकाने 'लोकमत'शी बोलताना सांगितले. यामुळे संशोधकाने विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बी. ए. चोपडे यांना निवेदन देऊन न्याय देण्याची मागणी केली आहे.

**प्रतिक्रिया...**

संस्थेच्या अध्यक्षपदाचा वाद न्यायालयात सुरु असल्यामुळे महाविद्यालयाचे बँक खाते सीज केलेले आहे. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या. यातच संस्थेचे अध्यक्ष बदलण्यात आले. याचा चेंज रिपोर्ट अद्याप आला नसल्यामुळे कोणतेही निर्णय घेता येत नाहीत. संशोधकाला शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी संस्थेकडे प्रयत्न करीत आहे.
-डॉ. किशोर साळवे, प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय

पीएच.डी.च्या संशोधकाने मंजूर झालेल्या राजीव गांधी शिष्यवृत्तीचे पैसे मिळाले नसल्याची तक्रार केली आहे. यावर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी महाविद्यालयाला लवकरच आदेश देण्यात येत आहेत.
-डॉ. सतीश पाटील, बीसीयूडी संचालक, विद्यापीठ



अनेक दिवसांपासून महाविद्यालय प्रशासनाकडे हक्काची शिष्यवृत्ती देण्याची मागणी करीत आहे. महाविद्यालय प्रशासनाला अनेकदा विनंती करण्यात आली. मात्र न्याय मिळाला नाही. शेवटी विद्यापीठाला यासंदर्भात कळविण्यात आले आहे. -संशोधक विद्यार्थिनी

---

**मराठवाडास्तरीय भरती :** २५ नोव्हेंबरपर्यंत होणार धावण्याची चाचणी परीक्षा

# वनरक्षक पदाचे १२२१ उमेदवार धावले

औरंगाबाद : वन विभागातर्फे सुरु असलेल्या मराठवाड्यातील उमेदवारांच्या वनरक्षक पदाच्या भरती प्रक्रि येतील धावण्याची चाचणी परीक्षा शेंद्रा एमआयडीसी परिसरात बुधवारपासून सुरु झाली. पहिल्याच दिवशी १५०० उमेदवारांपैकी १२२१ उमेदवार धावले.

मुख्य वनसंरक्षक मंडे, उपमुख्य वनसंरक्षक अशोक गिऱ्हेपुंजे यांच्यासह विविध जिल्ह्यांतील वनक्षेत्र अधिकारी यावेळी उपस्थित होते.

महिलांसाठी ३ किलोमीटर आणि पुरुष उमेदवारांसाठी ५ किलोमीटरची धावण्याची चाचणी घेण्यात आली. २४ आणि २५ नोव्हेंबर रोजीही चाचणी होणार आहे. उमेदवारांसाठी पाणी, वैद्यकीय सेवेची व्यवस्था करण्यात आली असून, जालना रोडवर आलेल्या उमेदवारांना कुंभेफळ चौकातून वन विभागाच्या गाड्यात बसवून चाचणीच्या स्थळी नेण्यात आले. चौकातही काही अधिकाऱ्यांना तैनात करण्यात आले होते. ५५९ महिला आणि ४,२७२ पुरुष धावण्याच्या चाचणीसाठी पात्र ठरले आहेत.



वनरक्षक पदासाठी शेंद्रा परिसरात बुधवारी धावण्याची चाचणी देताना उमेदवार.

**धावण्याचे छायाचित्रण**



- धावण्याच्या चाचणीचे छायाचित्रण केले जात आहे. त्यामुळे चाचणीत कुणीही गैरमार्गाचा अवलंब करणार नाही, याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.
- उमेदवारांच्या टायमिंगची नोंद घेण्यासाठी क्रीडा शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे वेळेत काही गोंधळ होणार नाही, याची वन विभागाने काळजी घेतलेली आहे.

**आरोग्य पथक...**

सध्या हिवाळ्याचे दिवस असले तरी धावताना कुणाला काही अडचणी येऊ नये व आरोग्याची तक्रार उद्भवल्यास एमजीएम आणि छत्रपती शाहू महाविद्यालयाचे आरोग्य पथक लक्ष ठेवून आहेत.

त्यांना ऑनलाईन माहिती देण्यात आली असून तारखेनुसार धावण्याच्या चाचणीत सहभागी होण्यास कळविले आहे.

**वन विभागाची यंत्रणा भक्कम...**

वन विभागातील मराठवाड्यातील विविध अधिकारी, कर्मचारी या चाचणीसाठी बोलावण्यात आलेले आहेत. परीक्षा प्रक्रियेवर ते बारकाईने लक्ष ठेवून आहेत. पुन्हा पळणाऱ्या उमेदवारांचे रेकॉर्डिंग होत असल्याने गैरप्रकार होणे शक्य नसल्याचे वन विभागाचे म्हणणे आहे.

### 'वीज तांत्रिकांचे काम मेणबत्तीप्रमाणे'

औरंगाबाद : वीज तांत्रिक कामगारांचे काम मेणबत्तीप्रमाणे आहे. मेणबत्ती जशी स्वत: जळून इतरांना प्रकाश देते तसेच हे कर्मचारी घर, कुटुंब, वैयक्तिक जीवनाला कमी वेळ देऊन ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा कसा होईल, यासाठी प्रयत्न करतात, असे मत विशेष पोलीस महानिरीक्षक अजित पाटील यांनी व्यक्त केले. राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेतर्फे आयोजित दिवाळी स्नेहमिलनात ते बोलत होते.

पाटील म्हणाले, पोलीस आणि वीज तांत्रिक कामगारांचा ड्रेस कोड सारखाच आहे. याचे कारण म्हणजे दोघेही जनतेसाठीच काम करतात. वीज कामगारांनी काम करताना सुरक्षा साधनांचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. मराठवाडा महसूल प्रबोधिनीत झालेल्या कार्यक्रमप्रसंगी महापारेषणचे मुख्य अभियंता जी. टी. मुंडे, अधीक्षक अभियंता दिनेश अग्रवाल, एस.जी. धाबेकर, देवेंद्र जयस्वाल, कार्यकारी अभियंता अर्शद पठाण, नामदेव गंधाले, राम काळे, अमित कुलकर्णी, व्ही. डी. कांबळे, संघटनेचे सरचिटणीस सय्यद जहिरोद्दीन, ताराचंद कोल्हे, अख्तर अली आदींची उपस्थिती होती.

# जिल्हाधिकारी, सीईओंना खंडपीठाची नोटीस

**गंगापूर तालुका :** रोहयो कामातील गैरव्यवहारप्रकरणी प्रलंबित कारवाई

औरंगाबाद : गंगापूर तालुक्यातील आगर कानडगाव येथील रोजगार हमीच्या कामात झालेल्या गैरव्यवहारप्रकरणी दाखल 'अवमान याचिके'च्या अनुषंगाने औरंगाबाद खंडपीठाचे न्या. आर. एम. बोर्डे आणि न्या. संगीतराव एस. पाटील यांनी जिल्हाधिकारी डॉ. निधी पांडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकरराजे आर्दड आणि तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित चौधरी यांना नोटीस बजावण्याचा आदेश दिला आहे.

गैरव्यवहार प्रकरणी संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई करण्याचे शपथपत्र दाखल करण्यात आले होते. त्यावरुन खंडपीठाने याचिका निकाली काढली होती. मात्र, शपथपत्रानुसार कारवाई केली नसल्यामुळे याचिकाकर्त्याने अवमान याचिका दाखल केली आहे.

आगर कानडगाव येथील रोजगार हमीच्या कामात झालेल्या गैरव्यवहारास कारणीभूत लोकांवर कारवाई करण्यासंदर्भात विलास विठ्ठल दंडे यांनी अॅड. रामदास शिनगारे पाटील यांच्यामार्फत जनहित याचिका दाखल करून चौकशीची मागणी केली होती.

चौकशीअंती वरील कामात गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई करण्याचे शपथपत्र जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दाखल केले होते. त्यावरुन खंडपीठाने याचिका निकाली काढली होती. मात्र, निकालानंतर तब्बल २२ महिने उलटले तरी संबंधितांवर शपथपत्रानुसार कारवाई केली नाही. म्हणून याचिकाकर्त्याने अवमान याचिका दाखल केली आहे. सुनावणीच्या वेळी अॅड. शिनगारे यांनी वरील बाब खंडपीठाच्या निदर्शनास आणून दिली.

### अल्पसंख्याक वसाहतींमध्ये २ कोटींची कामे

औरंगाबाद : शासनाकडून दरवर्षी अल्पसंख्याक वसाहतींमध्ये विकासकामे करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो. यंदाही २ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या निधीतून शहरात करण्यात येणाऱ्या कामांचे अंदाजपत्र तयार करावेत, असे आदेश बुधवारी विभागीय आयुक्त उमाकांत दांगट यांनी दिले.

अल्पसंख्याक वसाहतींमध्ये करण्यात येणाऱ्या विकासकामांचा आढावा आयुक्तांनी घेतला. यावेळी मनपा आयुक्त ओम प्रकाश बकोरिया, जिल्हाधिकारी निधी पांडे यांची उपस्थिती होती. कब्रस्तान, कॉंक्रीट रस्ते, पथदिवे आदी विकासकामे करावीत असे निकष शासनाने ठरवून दिले आहेत. मनपाकडे आलेल्या प्रस्तावांची छाननी करून त्वरित अंदाजपत्रकही तयार करा असे आदेश विभागीय आयुक्त उमाकांत दांगट यांनी दिले. मुस्लिम, जैन, पारसी, बौद्ध, ख्रिश्चन आदी समाजबांधवांना या योजनेचा फायदा घेता येईल. मनपाने सर्व समाजाला न्याय मिळावा या दृष्टीने पुढील प्लॅनिंग सुरु केली आहे.